■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०४ ■ मंगळवार दि.२२ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 304 ■ Tuesday Dt. 22 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# वाळू उपशाकडे चकलांबा ठाणे प्रमुखांचे दुर्लक्ष? कायद्याचे उल्लंघन खुलेआम सुरूच..!

## वाळू माफियांचे रॅकेट थांबणार कधी? हा प्रश्न जनतेच्या मनात अधिकच खोलवर घर करू लागला?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## वाळू माफियांचे गोदापात्रात खुलेआम साम्राज्य, प्रशासन झोपले की सामील; चकलांबा पोलिसांची बघ्याची भूमिका?

# एसपी साहेब.. राक्षसभुवन गोदापात्रातून रात्रीच्या वेळी हायवा, एलपी ट्रक हप्त्याच्या बदल्यात कचाकच वाळूने भरून जाताहेत, तिकडे बघा जरा?

## पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांचा हप्त्याचा रेट ठरलेला, हप्त्याच्या बदल्यात कायदा केला त्यांनी गप्प?

## रात्रीच्या अंधारात वाळू लुटली जाते आणि डिवायएसपी राजगुरु झोपलेत? वाळू तस्करीतून गप्प राहण्यामागे कारण काय?



गेवराई । प्रतिनिधी
चकलांबा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वाळू माफियांचे बेकायदेशीर साम्राज्य दिवसेंदिवस बळावत आहे आणि या सगळ्या गैरप्रकारामागे चकलांबा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांचा आशीर्वाद असल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे. पोलीस निरीक्षक माफियांकडून दर महिन्याला लाखो रुपयांचा हप्ता घेत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. तसेच एका नाईटचा हायवा वाल्यांकडून आणि एलपी ट्रक वाल्यांकडून बारा हजार रुपयांचा हप्ता घेत असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वाळू चोरीच्या अनेक ठिकाणांवर चकलांबा पोलिसांनी डोळेझाक केली असून, दोन पोलीस कर्मचारी राक्षसभूवन येथील गोदावरी नदीपत्रात वाळू माफियांकडून वसुली करत आहेत. यामध्ये पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांची थेट संलिप्तता असल्याचे बोलले जात आहे. चकलांबा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वाळू चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. मात्र या बेकायदेशीर वाळू उपशावर ठोस कारवाई करण्याऐवजी संबंधित चकलांबा पोलिसांचे याकडे सर्रास दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. चकलांबा पोलिसांकडून वाळू माफियांवर कारवाई होत नसल्याने या सगळ्या प्रकरणात पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडत आहे. वाढत्या वाळू माफियांच्या दबदब्यामुळे पर्यावरणाचे प्रचंड नुकसान होत आहे. तसेच नदीपात्रामधील अवैध उत्खननामुळे

पान २ वर






### डिवायएसपी नीरज राजगुरू यांचा कानाडोळा का?

राक्षसभुवन परिसरातील गोदापत्रातून रात्रीच्या वेळी हायवा व एलपी ट्रकद्वारे मोठ्या प्रमाणात वाळूची अवैध वाहतूक सुरू असून, स्थानिक चकलांबा पोलिसांच्या उपस्थितीतच हा सारा गैरप्रकार बिनबोभाट सुरू आहे. दरम्यान, या प्रकाराकडे डिवायएसपी नीरज राजगुरू यांचा ठरवून कानाडोळा केला जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. वाळू माफियांचे गोदापत्रावर पूर्ण वर्चस्व असून, पोलिसांना नियमित हप्ते देऊन ही तस्करी उघडपणे सुरू आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असताना डिवायएसपींच्या नजरेतून हे घडत नसल्याचे मान्य करणे कठीण आहे. ही बाब केवळ पोलिस खात्याच्या कार्यक्षमतेवरच नव्हे, तर त्यांच्या प्रामाणिकतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. जर डिवायएसपी नीरज राजगुरू यांना ही माहिती नसेल, तर ती गंभीर दुर्लक्षाची बाब आहे आणि माहिती असूनही दुर्लक्ष करत असतील, तर ती अजून गंभीर बाब ठरते. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### हप्तावसुली प्रकरणावर पोलीस अधीक्षक काय कारवाई करणार? जनतेचं लक्ष केंद्रित!

वाळू माफियांकडून हप्ता घेऊन वाळू माफियांना परवानगी देणाऱ्या चकलांबा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांविरोधात जनतेचा संताप उफाळून आला आहे. नागरिकांकडून या पोलीस निरीक्षक आणि ते वसुली करणारे दोन पोलीस कर्मचाऱ्यांचा तात्काळ निलंबन आणि कठोर कारवाईची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर आता सर्वांचे लक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे वळले आहे. पोलीस अधीक्षक काय भूमिका घेणार, दोषींवर कुठली पावले उचलणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. कारण जर या प्रकरणात निष्क्रियता दाखवली गेली, तर संपूर्ण पोलीस यंत्रणेवरचा जनतेचा विश्वास डळमळीत होण्याची शक्यता आहे. पोलिसच गुन्हेगारांना संरक्षण देत असतील, तर न्याय कुठे मिळणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### हप्तावसुली करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून निलंबित करा; संतप्त नागरिकांची मागणी!

वाळू माफियांकडून हप्ता वसूल करणाऱ्या चकलांबा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक आणि ते दोन पोलीस कर्मचारी यांच्यावर तात्काळ कारवाई करावी व त्यांना निलंबित करावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित पोलीस निरीक्षक बेकायदेशीर वाळू उत्खनन करणाऱ्या माफियांना अभय देत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणात जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी हस्तक्षेप करून चौकशी सुरू करावी आणि दोषींना निलंबित करून कडक शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी लोकांची ठाम भूमिका आहे. पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सामान्य जनतेचा पोलिसांवरील विश्वास ढासळत असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली असून, आता पोलीस खात्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## महादेव मुंडे हत्या प्रकरण : मनोज जरांगे पाटील यांनी घेतली मुंडे कुटुंबीयांची भेट

परळी । प्रतिनिधी
मस्साजोग येथील सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यात गाजत असलेल्या महादेव मुंडे यांच्या हत्येच्या प्रकरणाला आता नव्या घडामोडीने वेग आला आहे. मृत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी अनेक वेळा पोलिस प्रशासनाला आरोपींना अटक करण्याची मागणी केली होती. यासोबतच त्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत आंदोलनही छेडले होते.
या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी परळी येथे जाऊन महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या वेळी मुंडे कुटुंबीय भावनिक झाले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, एका कुटुंबीयाने सांगितले आहे की मांसाचा तुकडा टेबलवर ठेवत धमकावण्यात आले, असे गंभीर आरोप असूनही आरोपी मोकाट फिरत आहेत. महादेव मुंडे यांच्या हत्येला तब्बल २१ महिने उलटले तरीही तपास प्रलंबित आहे. मुख्यमंत्री गुंडांना पाठीशी घालायचे काम करत आहेत का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी जरांगे पाटील यांनी



पान २ वर

# वाल्मीक कराडला जोरदार झटका

## कोर्टाने संतोष देशमुख प्रकरणातून दोषमुक्त करण्याचा विनंती अर्ज फेटाळला; उज्ज्वल निकम यांची माहिती

बीड । प्रतिनिधी
सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या बीड स्थित विशेष कोर्टाने या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराडला जोरदार झटका दिला आहे. कोर्टाने या प्रकरणातून दोषमुक्त करण्याची वाल्मीक कराडची याचिका फेटाळून लावली आहे. यामुळे या गुन्ह्यातून स्वतःची सुटका करून घेणाऱ्या वाल्मीक कराडचा पाय अधिकच खोलात गेला आहे.



बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा सहकारी वाल्मीक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. वाल्मीक कराडने या आरोपाला आव्हान देत आपल्याला दोषमुक्त करण्याची मागणी केली होती. पण बीड स्थित विशेष कोर्टाने मंगळवारी त्याची ही याचिका फेटाळून लावली. आजच्या सुनावणीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी ही माहिती दिली.



उज्ज्वल निकम म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातून मला दोषमुक्त करावे अशी मागणी वाल्मीक कराडने एका अर्जाद्वारे केली होती. तो अर्ज न्यायालयाने आज फेटाळून लावला. त्यानंतर विष्णू चाटे व इतर आरोपींनीही आपल्याला या खटल्यातून वगळून दोषमुक्त करावे असा अर्ज दाखल केला. त्यावर मी जोरदार हरकत घेतली. कोर्टाला सांगितले की, ही आरोपींची एक मोडस ऑपरेंडी आहे. एका

पान २ वर

# गट, गणांसाठी पक्षांसह इच्छुकांकडून सावध मोर्चेबांधणी

## आरक्षणाच्या तारखांकडे लागल्या नजरा : उमेदवारीसाठी या–त्या पक्षात मारणार का उड्या?



पात्रुड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद गट–गणांचा प्रारुप आराखडा नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये माजलगाव तालुक्याचे ६ गट, तर १३ गण अस्तित्वात आले आहेत. नुकतीच माजलगाव तालुक्यातील सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली; परंतु जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आधी होण्याची शक्यता असल्याची चर्चा नागरिकांमध्ये गट–गणांच्या आरक्षणाकडे इच्छुकांच्या लागल्या असून आतातरी सावध मोर्चेबांधणीला सुरुवात करण्यात आली आहे. नजरा सध्या पक्षांतराचे वारे वाहत आहेत. त्यामुळे आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे काय होणार, असा प्रश्न इच्छुकांना पडला आहे.

राज्य निवडणूक आयोग कधी आरक्षणाची तारीख जाहीर करते, यासाठी आतापासूनच इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सावध चालू असून त्यांचे आरक्षणावर लक्ष केंद्रित झाले आहे. त्यामुळे माजलगाव तालुक्यात सर्व पक्षांनी जोरदार, पण सावध मोर्चेबांधणी सुरू केली. प्रत्येक गटात व गणात इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी करून राजकीय आखाडे बांधण्यास सुरुवात केली आहे. आपल्याच सोईचे आरक्षण पडणार का? या विचाराने प्रत्येक गावात मोर्चेबांधणी चालू झाली असून त्यानुसार गट व गण आपल्याच ताब्यात ठेवण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडे फेऱ्या वाढल्याचे दिसून येत आहे. जर कोणत्याच पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही तर अपक्ष उमेदवारसुद्धा स्वबळावर निवडणूक लढविण्याचा नारा देत आहेत आणि आपणच कसे निवडून येणार, याकडे मतदारांचे लक्ष वेधत आहेत.

**एकमेकांचा पत्ता गुल करून..**

माजलगाव तालुक्यातील ग्रामीण तरुणाई या पदांची स्वप्ने रंगवून विविध कार्यक्रमांना हजेरी लावणे जनसामान्यांची कामे करणे अशी तयारी केली आहे. तर ज्येष्ठांनीसुद्धा तरुणांपुढे आवाहन उभे केले आहे. तरुणाईने आपली ताकद निवडणुकीच्या रिंगणात दाखविण्यासाठी बरीच तयारी केली आहे. पण अनेक ज्येष्ठ मंडळी मी पक्षाचा एकनिष्ठ कार्यकर्ता असून पक्ष माझाच विचार करेन असे सांगत आहेत. सर्वच पक्षातील तरुण व ज्येष्ठ मंडळींची राजकीय रंगीत तालीम तालुक्यात सुरू आहे.पात्रुड येथील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात इच्छुक उमेदवार जास्त असून एकमेकांचा पत्ता गुल करून आपलीच उमेदवारी कशी कायम होईल, याकडे आतापासूनच भर देत आहे.

**युती–आघाडी की...**

गट व गणात पडणाऱ्या आरक्षणामुळे वातावरण गरम आहे. आरक्षण नेमके काय पडेल, याचा कयास आखून पात्रुड येथील रणनीती आखली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडुन मोमीन मुखतार, शेख सलीम मामु हे ईच्छुक असुन या दोघांनी जोरदार त्यारी सुरु केली आहे शिवसेना उद्धव ठाकरे गट, काँग्रेस पक्ष व मनसे हे एकत्र येऊन निवडणूक लढविणार का ? तर दुसऱ्या बाजुला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारगटाकडुन ईच्छुक असलेले माजी सभापती डॉ. वसीम मनसबदार, विधमान सरपंच मोमीन लतीफ, डॉ. शोईब, युवा नेते मोमीन जुबेर यांनी पात्रुड पंचायत समिती लढवण्याची तयारी सुरु केली आहे पण भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट हे एकत्र येऊन निवडणूक लढविणार का ? याबाबत माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथील नागरिकांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.

# केजच्या युवकाचा पुण्याजवळ कासारसाई धरणात बुडून मृत्यू

केज । प्रतिनिधी

पवन मावळातील कासारसाई धरणात पर्यटनासाठी गेलेल्या युवकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. रविवारी सकाळी अकराच्या



सुमारास संतोष शहाजी राऊत (वय १९, रा. साने कॉलनी, चिखली, मूळ गाव माळेगाव, ता. केज, जि. बीड) हा धरणाच्या पाण्यात पोहताना अचानक बुडाला.

या घटनेनंतर वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि शिवदुर्ग रेस्क्यू, लोणावळा यांच्या पथकांनी शोधमोहीम सुरू केली होती. मात्र, रविवारी रात्री अंधार पडल्याने शोधकार्य थांबवावे लागले. सोमवारी सकाळपासून पुन्हा शोध घेण्यात आला. अखेर दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात पथकाला यश आले.

संतोष राऊत हा आपल्या इतर मित्रांसोबत रविवारी कासारसाई धरण परिसरात पर्यटनासाठी गेला होता. धरणाच्या पाण्यात पोहत असताना तो खोल पाण्यात गेला आणि बुडाला. या घटनेमुळे मित्रपरिवारासह कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. शोध मोहिमेत वन्यजीव रक्षक मावळ संस्था व शिवदुर्ग रेस्क्यू, लोणावळा या संस्थांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

# अंबाजोगाईत, केजमधील बिअरबार चोरट्यांनी फोडले; लाखोंचा मुद्देमाल लंपास

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर व केज तालुक्यातील मस्साजोग येथे दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरट्यांनी बिअरबार व बिअर शॉपी फोडून लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अंबाजोगाई शहरात राजवीर बिअर शॉपी फोडली**

दि. १९ जुलै २०२५ रोजी रात्री १० वाजेपासून ते २० जुलै रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान अंबाजोगाई शहरातील श्रीकृष्ण नगर, मानवलोकजवळ असलेल्या राजवीर बिअर शॉपीत चोरट्यांनी दुकानाचे शटर, कडी, कोंडा व कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. या ठिकाणाहून बिअरसह ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस नेण्यात आला आहे. या प्रकरणी व्यंकटेश नागनाथ गंजेवार (वय २६, रा. कृष्णाई नगर, अंबाजोगाई) यांनी फिर्याद दिली आहे.

**मस्साजोग येथील अभिषेक बिअर बारमध्ये चोरी**

याच दरम्यान केज तालुक्यातील मस्साजोग येथे अभिषेक बिअरबार परमीट रूम या ठिकाणीही चोरीची घटना घडली आहे. बालासाहेब कुंडलिक गायकवाड (वय ५०, व्यवसाय शेती, रा. मस्साजोग) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १९ जुलै रोजी रात्री १० वाजल्यापासून ते २० जुलै रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी हॉटेलचे गेट व गोडावूनची कुलुपे तोडून आत प्रवेश केला.

या ठिकाणाहून चोरट्यांनी विविध प्रकारच्या विदेशी दारूचे बॉक्स व रोकड असा एकूण १,५२,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या दोन्ही घटनांमध्ये अज्ञात चोरट्यांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

# क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानचे २०२५ चे पुरस्कार जाहीर

## विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते बीड येथे ३ आगष्टला होणार भव्य सन्मान

बीड । प्रतिनिधी

क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने २०२५ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. क्रांतिसिंह नाना पाटील अण्णाभाऊ साठे यांची जयंती व शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी क्रांतिसिंह पुरस्काराने सामाजिक चळवळीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येतात. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. यामध्ये कृषी,राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, कला, क्रीडा व इतर क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा क्रांतिसिंह नाना पाटील विकास प्रतिष्ठानच्या वतीने हा गुणगौरव सोहळा संपन्न होणार आहे.

यामध्ये राजकीय क्षेत्रामध्ये विस्थापित असलेल्या समाजामध्ये लढा देऊन राजकारणामध्ये लोकशाहीमध्ये सर्वांना सर्व अधिकार आहेत हे दाखवून देण्याचे काम केले आहे. असे, अरुण जाधव यांना राजकीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच ज्यांनी आजपर्यंत हजारो झाडं वाटण्याचे आणि जीवनमान उंचावण्याचं काम ज्यांनी केलं. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणारे राजाभाऊ देशमुख यांना कृषी पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच पर्यावरण संवर्धन ठेवून समाजामध्ये जनजागृती करण्याचं काम असे सुधाकर देशमुख यांना पर्यावरण संरक्षण व संवर्धन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच व्यसनाधीन झालेल्या समाजांना माणसांमध्ये आणण्याचे काम करतात व ज्यांचे संसार उध्वस्त होत आहेत,त्यांना चांगल्या मार्गामध्ये आणण्याचे काम जे करतात असे डॉ. संदीप तांबारे यांना आरोग्य संवर्धन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. सोबतच ज्यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर समाज प्रबोधन करतात असे अकलूज येथील शाहीर राजेंद्र कांबळे यांना सांस्कृतिक कला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. व शैक्षणिक क्षेत्रामध्ये कॉ राजकुमार कदम यांना जाहीर झालेला आहे. व कामगार चळवळ ज्यांनी मोठ्या हिरीरीने चालवण्याचं काम केलं अशा उज्वला पडलवार यांना कामगार चळवळ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच, सांप्रदायिक क्षेत्रात ह.भ.प श्यामसुंदर सोन्नर यांना सांप्रदायिक व ज्यांनी शोध पत्रकारिता जगासमोर मांडण्याचं काम केलं असे संपत मोरे सांगली यांना शोध पत्रकारिता हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्रामध्ये ज्यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे, अशा जागृती अमरजीत तिवारी धारूर यांना क्रीडा क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाला आहे. अशा विविध मान्यवरांचा सत्कार सोहळा क्रांतिसिंह नाना पाटील विकास प्रतिष्ठानच्या वतीने व विविध मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑगस्ट रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. अशी माहिती क्रांतिसिंह प्रतिष्ठानचे तथा शेकापचे नेते भाई मोहन गुंड, भाई अशोक रोडे, ड भाई नारायण गोले, भाई बापुसाहेब सोळके यांनी दिली आहे.

# कृतियूक्त, आनंददायी शिक्षण पद्धतीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने हेच आमचे ध्येय : दीपक तांदळे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात इयत्ता चौथी चा पालक सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या पालक सुसंवाद मेळाव्याचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे सर (अध्यक्ष, श्री पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था) तसेच पर्यवेक्षक इंगळे सर, श्रीमती रणखांब यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

श्री पद्मावती शिक्षण संस्थचे सचिव श्री दिपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की विद्यार्थ्यांच्या मनाला त्याच्या सर्वोत्तम क्षमतेनुसार विकसित व सक्षम करण्यासाठी, केवळ पाठ्यपुस्तकांवर आधारित शिक्षण आणि शैक्षणिक ज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, सर्वांगीण विकासावर भर देणे आवश्यक आहे.म्हणूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे हेच ध्येय नजरेसमोर ठेवून संस्कार शाळा कार्य करत असते. आम्ही संस्कार प्राथमिक शाळेच्या माध्यमातून परळी तालुक्यातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहोत. विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक व भावनिक विकास साधून एक आदर्श, सर्वगुणसंपन्न व संस्कारक्षम विद्यार्थी घडवू. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे हाच संस्कार प्राथमिक शाळेचा ध्यास आहे. असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

पालक सुसंवाद मेळाव्याला उपस्थित पालकांनी पांडे, अश्विनी पुजारी, विजय केंद्रे, लोखंडे, प्रल्हाद जोशी, गीता सोळंके, चाटे, धनश्री सोळंके, पवार यांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त केले,आमचा पाल्य संस्कार शाळेत शिकतोय ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. संस्कार प्राथमिक शाळा ही एक आदर्श शाळा आहे. संस्कार शाळा परळी ही तालुक्यातील एकमेव शाळा आहे जी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करते. ही शाळा आमच्या पाल्यांना शिस्तप्रिय व आदर्श घडवत आहेत. संस्कार शाळा खरंच अगदी नावाप्रमाणे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम घडवत आहे त्यांच्यातील सुप्तगुणांना नेहमी वाव देत असते. पुण्याच्या शाळेत पन्नास हजार फीस भरून देखील आम्हाला ज्या शैक्षणिक सुविधा भेटल्या नाहीत त्या संस्कार शाळेत भेटतात असे पालक केंद्रे विजय यांनी म्हटले तसेच संस्कार प्राथमिक शाळेचे सांस्कृतिक सल्लागार माननीय श्री लखनजी परळीकर सर यांनी देखील पालक म्हणून उपस्थिती दर्शविली ते म्हणाले आम्ही खूप नशीबवान आहोत आमच्या पाल्य या शाळेत शिकत आहे आणि ही एक मराठी शाळा आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे विद्यार्थ्यांचा विकास चोहोबाजूंनी घडावा यासाठी संस्कार प्राथमिक शाळा नेहमीच कार्यशील असते आणि माझ्या पाल्यांमध्ये अमुलाग्र बदल घडवणारी विद्यार्थ्यांच्या अवतीभोवती उत्तमरीत्या शैक्षणिक तसेच संस्कारशील वातावरण निर्माण करणारी संस्कार प्राथमिक शाळा आहे तसेच पालकांनी संस्कार पॅटर्नची स्वयंनिर्मित पुस्तके, अबॅकस, ऍलन अभ्यासक्रम या विषयी शाळेचे कौतुक केले.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या परळी विधानसभा अध्यक्षपदी गोविंदराव देशमुख यांची पुन्हा नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी विधानसभा अध्यक्षपदी धनंजय मुंडे यांचे विश्वासू गोविंदराव देशमुख यांची आज पुन्हा एकदा नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी वैजनाथराव सोळंके व शहराध्यक्षपदी बाजीराव भैया धर्माधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आज बीड येथे संपन्न झालेल्या पदाधिकारी संवाद मेळाव्याच्या दरम्यान सदर नियुक्तीची पत्रे खासदार सुनील तटकरे तसेच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कार्यकारिणी बरखास्त केल्यानंतर ही पदे रिक्त होती. दरम्यान आज प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता धनंजय मुंडे यांच्या टीम मधील त्यांचे विश्वासू गोविंदराव देशमुख यांच्यासह वैजनाथराव सोळंके व बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली असून याबद्दल धनंजय मुंडे यांनी संबंधितांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित, आमदार विक्रम काळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सौ रूपालीताई चाकणकर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार संजय भाऊ दौंड, माजी आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, युवक नेते अजय मुंडे यांसह पदाधिकारी व आजी–माजी लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

# कमी झोपेमुळे होतात 'या' पाच गंभीर समस्या : डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

आजच्या धावपळीच्या जीवनात झोपेला अनेक जण महत्त्व देत नाहीत. कामाचा ताण असो किंवा रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरणे, अनेक लोकांची पुरेशी झोप होत नाही; पण झोपेची कमतरता तुमच्या शरीरासाठी किती धोकादायक ठरू शकते, हे तुम्हाला माहीत आहे का? विशेषतः वृद्धांसाठी कमी झोप अनेक गंभीर आजारांना आमंत्रण देऊ शकते. झोपेच्या कमतरतेमुळे कोणत्या ५ गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात, हे जाणून घ्या.

हृदय : पुरेशी झोप न घेतल्याने हृदयावर थेट परिणाम होतो. झोपेच्या कमतरतेमुळे रक्तदाब वाढू शकतो. परिणामी, हृदय आणि रक्तवाहिन्यांवर जास्त दाब येतो. दीर्घकाळ असे झाल्यास हार्ट अटॅक आणि स्ट्रोक यांचा धोका खूप वाढतो. वृद्धांमध्ये आधीपासूनच हृदयविकार होण्याची शक्यता जास्त असल्याने झोपेची कमतरता त्यांच्यासाठी अधिक धोकादायक ठरू शकते. मधुमेह : झोपेची कमतरता शरीराच्या ग्लुकोज हाताळण्याच्या क्षमतेवर परिणाम करते. तुम्ही पुरेशी झोप घेत नाही तेव्हा तुमचे शरीर इन्सुलिनला कमी प्रतिसाद देते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. ही स्थिती हळूहळू टाईप – २ मधुमेह होण्यास कारणीभूत ठरू शकते.



वृद्धांमध्ये चयापचय क्रिया मंद असल्याने हा धोका आणखी वाढतो.

मानसिक आरोग्य :– झोपेच्या कमतरतेचा आपल्या मानसिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. पुरेशी झोप न घेतल्याने ताण, चिंता आणि नैराश्य यासारख्या समस्या वाढू शकतात. याचा स्मरणशक्ती आणि एकाग्रतेवरही परिणाम होतो. वृद्धांमध्ये एकटेपणा आणि सामाजिक अलिप्तता जाणवण्याची शक्यता असते. झोपेची कमतरता या नकारात्मक भावनांना आणखी वाढवू शकते.

रोगप्रतिकारकता : झोपेच्या वेळी आपले शरीर सायटोकाईन्स नावाचे प्रोटिन तयार करते आणि ते सूज आणि संक्रमणांशी लढण्यास मदत करतात. आपल्याला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा या संरक्षक सायटोकाईन्सचे उत्पादन कमी होते आणि रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. वृद्धांची रोगप्रतिकारशक्ती नैसर्गिकरीत्या कमकुवत असते. त्यामुळे झोपेची कमतरता त्यांना संक्रमणांसाठी त्यांना संक्रमणांसाठी अधिक संवेदनशील बनवते.

वजन वाढ : झोपेची कमतरता आपल्या भुकेवर नियंत्रण ठेवणाऱ्या हार्मोन्सनादेखील प्रभावित करते. कमी झोप घेतल्याने प्रेलिन या भूक वाढवणाऱ्या हार्मोनची पातळी वाढते आणि लेप्टिन या भूक कमी करणाऱ्या हार्मोनची पातळी कमी होते. यामुळे जास्त भूक लागते आणि अनावश्यक खाण्याची सवय लागते. परिणामी, लठ्ठपणा वाढण्याचा धोका असतो. वृद्धांमध्ये शारीरिक हालचाली कमी असल्याने ही समस्या अधिक गंभीर होऊ शकते, असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई (गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

पान १ वरून...

## एसपी साहेब.. राक्षसभुवन गोदापत्रातून रात्रीच्या वेळी हायवा

पाण्याची पातळी कमी होत असून आसपासच्या शेतकऱ्यांना त्याचा फटका बसतो आहे. पोलिस प्रशासनातील काही कर्मचारी वाळू माफियांसोबत हातमिळवणी करत असल्याच्या चर्चा स्थानिक पातळीवर जोरात आहेत. त्यामुळे आता जनतेतून मागणी होत आहे की, या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी. विशेष म्हणजे ही सर्व बेकायदेशीर हालचाल चकलांबा पोलिसांच्या नजरेसमोर घडत असूनही कुठलीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. गेल्या काही दिवसांपासून काही नागरिकांनी आणि वृत्तपत्रांनी वारंवार आवाज उठवूनही प्रशासनाचे दुर्लक्ष कायम आहे. त्यामुळे चकलांबा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे स्वतःच माफियांना पाठीशी घालत आहेत का? असा संशय उपस्थित होतोय. वाळू माफियांचा रात्रीच्या अंधारात ट्रॅक्टर, हायवा आणि एलपी ट्रॅकने वाळू ची वाहतूक सुरू आहे. पोलिस पेट्रोलिंग असतानाही ही वाहतूक कशी काय सुरू आहे, हा मोठा प्रश्न आहे. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने गंभीर ठरणाऱ्या या प्रकारांवर जर लवकरच नियंत्रण आणले गेले नाही, तर येत्या काळात नैसर्गिक आपत्ती आणि जलस्त्रोतांचे नुकसान होण्याचा धोका वाढणार आहे. वाळू माफियांच्या हायवा आणि एलपी ट्रॅकवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने सामान्य नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. पाण्याच्या स्त्रोतांचा नाश, पर्यावरणाचा ऱ्हास आणि कायद्याचा अपमान या सगळ्याच प्रश्नांनी स्थानिक पातळीवरचे नागरिक त्रस्त झाले आहेत. न्यायव्यवस्थेचा आणि कायद्याचा खुलेआम उपहास होत असताना जिल्हा प्रशासन मात्र शांत आहे. आता जनतेतून जोरदार मागणी होत आहे की, या हप्ता प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होऊन दोषींना कठोर शिक्षा व्हावी.

## नोज जरांगे पाटील यांनी घेतली मुंडे कुटुंबीयांची भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक (ओएसडी) यांच्याशी थेट फोनवर संपर्क साधून या प्रकरणावर चर्चा केली. २५ तारखेपर्यंत या प्रकरणात एसआयटी नियुक्त झाली नाही, तर बीडसह संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच, या प्रकरणातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कॉल डिटेल्स तपासण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

सरकारकडून आरोपींना अटक झाली पाहिजे – ज्ञानेश्वरी मुंडे

या भेटीनंतर बोलताना ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या की, मनोज दादांनी आश्वासन दिले आहे की मुख्यमंत्र्यांशी बोलून २५ तारखेच्या आत एसआयटी व सीआयडीची नियुक्ती करण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच आरोपींना अटक करण्यास सरकारला सूचना दिल्या जातील, असेही त्यांनी सांगितले. आता तरी या प्रकरणाच्या तपासाला वेग येईल, अशी आशा आहे. आरोपींना अटक झाली नाही, तर दादांनाही महाराष्ट्र बंद करण्याची वेळ येऊ नये, हीच अपेक्षा आहे. माझ्या माहेर आणि सासरच्या लोकांनी रास्ता रोको आंदोलनाचीही तयारी दाखवली आहे. सरकारने तात्काळ आरोपींना अटक करावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## वाल्मीक कराडला जोरदार झटका

आरोपीचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्यानंतर दुसऱ्याने अर्ज करायचा त्यानंतर तिसऱ्याने करायचा या पद्धतीने वेळेचा अपव्यय करायचा. खटला लांबवत न्यायचा. हा त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे आम्ही न्यायालयाला सगळ्या आरोपींना एकाचवेळी असा अर्ज करण्याची सूचना करण्याची विनंती केली.

त्यानुसार विष्णू चाटेसह सर्वच आरोपींनी कोर्टात दोषमुक्तीचा अर्ज दाखल केला आहे. आम्ही या अर्जावर खुलासा दिला आहे. वाल्मीक कराडने कोर्टात जामिनावर सुटका करण्याचा अर्ज दाखल केला आहे. त्यालाही आम्ही विरोध करत आहोत, असे उज्ज्व निकम म्हणाले. न्यायालयाने कोणत्या पद्धतीने आरोपींवर आरोप दाखल करावे यासाठी आम्ही कोर्टाच्या मदतीसाठी एक ड्राफ्ट चार्ज दाखल केला आहे, अशी माहितीही उज्ज्वल निकम यांनी यावेळी दिली.

वाल्मीक कराडच्या वकिलांनी यापूर्वीच्या सुनावणीत आपल्या अशिलाचा संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी कोणताही हात नसल्याचा दावा केला होता. ते म्हणाले होते की, प्रस्तुत प्रकरणात ३ वेगवेगळे गुन्हे आहेत. प्रत्येक एफआयआरचे वेगवेगळे आरोपपत्र दाखल झाले पाहिजे. वाल्मीक कराडचा मकोकाशी कोणताही संबंध नाही. त्यांचा गुन्हा व एफआयआर वेगळा आहे. ६ डिसेंबर रोजी वॉचमन सोनवणे यांना मारहाण झाली.

या घटनेचा खंडणीशी कोणताही संबंध नाही. या प्रकरणात शिवराज देशमुख हा मुख्य फिर्यादी आहे. त्याच्या जबाबात वाल्मीक कराडचे कुठेही नाव नाही. १५ जानेवारी २०२५ रोजी वाल्मीक कराडला हत्या प्रकरणात आरोपी करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणात अण्णा म्हणजे वाल्मीक कराड हाच आहे असे नाही. संतोष देशमुख यांनाही अण्णा म्हणूनच बोलावले जात होते. पण वाल्मीकलाच अण्णा म्हणून आरोपी करण्यात आले. सीआयडीने मांडलेले मत हे त्यांचे आहे. या प्रकरणी पोलिस तपास गरजेचा होता, असेही ते म्हणाले होते.

# अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे शिरूर कासार तालुक्यासह महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे नुकसान

शिरूर कासार । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये अकरावी प्रवेशासाठी राबवण्यात येणारी ऑनलाइन प्रक्रिया अनेक विद्यार्थ्यांसाठी सोयीची असली तरी, काहीवेळा यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असते. लेट कॉलेज भरणे म्हणजे महाविद्यालयात उशिरा प्रवेश मिळणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे अनेक प्रकारे नुकसान होऊ शकते, असे शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी सांगितले.



लेट कॉलेज भरल्यामुळे होणारे संभाव्य नुकसान अभ्यासक्रमातील पिछेहाट: महाविद्यालये सुरू झाल्यानंतर लगेचच अध्यापन सुरू होते. जर विद्यार्थ्याला उशिरा प्रवेश मिळाला, तर तो सुरुवातीच्या अनेक महत्त्वाच्या धड्यांना आणि संकल्पनांना मुकतो. यामुळे त्याला अभ्यासक्रमात इतरांपेक्षा मागे राहावे लागते आणि नंतर ही उणीव भरून काढण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागतात. शिकवण्या आणि कोचिंगमध्ये अडचण: अनेक विद्यार्थी महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाला पूरक म्हणून शिकवण्या किंवा कोचिंग क्लासेस लावतात. जर महाविद्यालयात प्रवेश उशिरा झाला, तर शिकवण्यांचे वेळापत्रक आणि महाविद्यालयाचे वेळापत्रक जुळवताना अडचणी येतात. काहीवेळा चांगल्या शिकवण्यांचे बॅचेस पूर्ण होतात आणि विद्यार्थ्याला पर्याय मिळत नाही.

शैक्षणिक ताण आणि चिंता: उशिरा प्रवेशामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दबावाखाली विद्यार्थी येतो. यामुळे त्यांच्यावर मानसिक ताण येतो आणि परीक्षेची चिंता वाढते. याचा परिणाम त्यांच्या अभ्यासाच्या गुणवत्तेवर आणि आरोग्यावरही होऊ शकतो. नवीन वातावरणाशी जुळवून घेण्यात अडचण: महाविद्यालयाचे पहिले काही दिवस नवीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे असतात, कारण या काळात ते नवीन मित्र बनवतात, महाविद्यालयाचे नियम समजून घेतात आणि तेथील वातावरणाशी जुळवून घेतात. उशिरा प्रवेश मिळाल्यास, विद्यार्थी या प्रक्रियेत मागे पडू शकतात आणि त्यांना मित्र बनवण्यात किंवा नवीन वातावरणात रुळण्यात अडचणी येऊ शकतात.

कला आणि क्रीडा उपक्रमांपासून वंचित: अनेक महाविद्यालये शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विविध कला, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करतात. उशिरा प्रवेश मिळाल्यास, विद्यार्थी या उपक्रमांमध्ये भाग घेण्यापासून वंचित राहू शकतात, ज्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होतो. प्रॅक्टिकल्स आणि अंतर्गत मूल्यमापनात अडचण: विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रॅक्टिकल्स अत्यंत महत्त्वाचे असतात. उशिरा प्रवेशामुळे त्यांचे काही प्रॅक्टिकल्स सुटण्याची शक्यता असते, ज्यामुळे त्यांना संकल्पना समजून घेण्यात आणि अंतर्गत मूल्यमापनात कमी गुण मिळण्यात अडचण येऊ शकते.

भविष्यातील स्पर्धा परीक्षांवर परिणाम: जर विद्यार्थ्यांना अकरावी-बारावीच्या मूलभूत संकल्पना नीट समजल्या नाहीत, तर त्याचा परिणाम भविष्यातील छएएढ, गएए, चक्ष्ढ-उएढ सारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीवर होऊ शकतो. ऑनलाइन प्रक्रिया सोयीची असली तरी, ती वेळेत आणि सुरळीत पार पडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जेणेकरून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल

यानंतर शिक्षण बोर्डाने या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेवर विचार करून विद्यार्थ्यांचा विचार करून सर्व शिक्षकांचे म्हणणे ऐकून जर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना कॉलेज त्यांच्या मान्य नुसार चॉईस करता येत नसेल तर ही निश्चित नुकसानीची बाजू आहे विद्यार्थ्यांची म्हणून सरकारने विद्यार्थ्यांचा विचार करून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा विचार करा, नसता विद्यार्थ्यांसाठी रस्त्यावर उतरेल शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी सांगितले आहे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात पालक मेळावा व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उपस्थित रहा : डॉ.काकडे

धारूर । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या धारूर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयात शुक्रवार दि.२५ जुलै २०२५ रोजी सकाळी



११ वाजता पालक मेळावा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. या पालक मेळाव्यास व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभास आजी-माजी विद्यार्थ्यांनी, पालकांनी व परिसरातील शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी केले आहे.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगती बाबत विचार विनिमय करण्यासाठी शुक्रवार दिनांक २५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पालक मेळाव्याचे व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या पालक बैठकीसाठी व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विकास समितीचे प्रमुख सदस्य जयसिंग भैय्या सोळंके, लोभाजी भाऊ सिंग चव्हाण, अजय सिंह दिखत, इंद्रजीत जाधव, डॉ.राम शिंनगारे यांची उपस्थिती असणार आहे. या सत्कार समारंभ कार्यक्रमास व पालक मेळाव्यास आजी-माजी विद्यार्थ्यांनी, सर्व पालकांनी व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वत्तीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोपाळ काकडे यांनी केले आहे.

## भारतीय जनता पार्टीच्या बीड तालुका सरचिटणीस पदी अप्पासाहेब झोडगे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

बालाघाटावरील चौसाळा परिसरातील कानडी घाटचे उपसरपंच अप्पासाहेब झोडगे यांची भारतीय जनता पार्टीच्या बीड तालुका सरचिटणीस पदी निवड करण्यात आली असुन ही निवड लोकनेत्या पंकजाताई मुंडे, मा.खा. प्रितमताई मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिल्हा कोषध्यक्ष चंद्रकांत फड यांच्या सुचनेनुसार बीड तालुका अध्यक्ष अशोक दादा रसाळ यांनी ही निवड केली.



आहे. अप्पासाहेब झोडगे हे गेल्या दहा वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते असुन त्यांनी चौसाळा परिसरासह बालाघाटावर अनेक कार्यकर्ते जोडले असुन वाडी, वस्ती, तांडयावर जावुन लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या काळात पक्षाचा प्रचार प्रसार मोठया प्रमाणावर केला होता तसेच ते कानडीघाट या गावचे उपसरपंच असुन अनेकाच्या सुख दुखात धावुन जाणारा कार्यकर्ता म्हणुन त्यांची ओळख असुन या कामाची पावती म्हणुन त्यांची भारतीय जनता पार्टीच्या बीड तालुका सरचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे या निवडीमुळे बालाघाटासह चौसाळा परिसरातुन त्यांच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# केज येथे कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने मोहम्मद रफी गीत गायन स्पर्धेचे आयोजन

केज । प्रतिनिधी

केज येते राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ संलग्न कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने दि.३१ जुलै रोजी भव्य आणि दिव्य मोहम्मद रफी गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. अनेक वर्षानंतर केज येथे अशा प्रकारची स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. केज शहरातील सांस्कृतिक चळवळ ही बऱ्याच वर्षापासून बंद पडलेली होती, परंतु कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने संगीत क्षेत्राचा वारसा उत्कृष्टरित्या पुढे चालवण्याचे काम सुरू आहे. या कार्याला केज शहरातून नव्हे तर मराठवाड्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.



कला क्रीडा विश्व समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे केज शहरातील नागरिकांतून कौतुक देखील होत आहे. सदरील स्पर्धा दुपारी ०२:०० वाजता मुक्ताई फंक्शन हॉल येथे होणार असून, तेव्हा या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा, असे आव्हान राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ संलग्न कला क्रीडा विश्व समिती केजच्या वतीने करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी संगीत क्षेत्रातील तज्ञ असे परीक्षक नेमले गेलेले आहेत. परीक्षकांचा जो निर्णय असेल तो अंतिम निर्णय राहील. या स्पर्धेमध्ये स्त्री आणि पुरुष असे दोन गट केलेले आहेत. यामध्ये पुरुष गटासाठी मोहम्मद रफी यांचेच गीत स्पर्धेमध्ये स्वीकारले जातील. त्याचप्रमाणे महिलांमध्ये खुल्या स्पर्धा होतील. यामध्ये लता मंगेशकर, आशा भोसले किंवा इतर कुठल्याही गायिकेचे गाणे या स्पर्धेमध्ये गाऊ शकतात. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ असे स्पर्धक निवडले जातील. यामध्ये पुरुष आणि महिला यांच्याकरिता समान बक्षीसे ठेवलेली आहेत. प्रथम रोख रक्कम बक्षीस ५००१, द्वितीय ३००१, तृतीय २००१ व उत्तेजनार्थ १००१ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. संपर्क करिता ९८६०४४७१८, ८६९८५६६४१४, या नंबर वरती संपर्क करावा व जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा.





## राजपाल काकडे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्षपदी निवड


केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात युवकांची मोठी फळी निर्माण करणारे युवा नेते राजपाल भैया काकडे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य नामदार पंकजाताई मुंडे, मा.खासदार प्रितमताई मुंडे, केज मतदार संघाच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा, राज्य परिषद सदस्य अक्षयजी मुंदडा, जेष्ठ सामाजिक नेते नंदकिशोर मुंदडा, तालुकाध्यक्ष भगवान केदार यांच्या आदेशाने युवा नेते राजपाल भैया काकडे यांची भाजपच्या युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक तसेच मित्र परिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## डॉ. निलेश मिसाळ यांचा यशस्वी उपचार; एकापेक्षा जास्त अवयव निकामी झालेल्या ६० वर्षीय रुग्णाला दिले जीवनदान!

बीड । प्रतिनिधी

६० वर्षांचे एक गंभीर रुग्ण यशस्वीरीत्या बरे झाले असून डॉ. निलेश मिसाळ व त्यांच्या टीमने अत्यंत कठीण परिस्थितीत रुग्णाला वाचवले आहे. रुग्णाला आधीपासूनच हृदयविकार, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज आणि अनियंत्रित मधुमेह असे त्रास होते. रुग्णाला श्वास घेण्यास त्रास, ताप आणि प्रचंड अशक्तपणा यांसारख्या तक्रारी घेऊन तातडीने दाखल करण्यात आले.



तपासणीनंतर डॉक्टरांनी मूत्रमार्ग संसर्ग, सेप्टीक शॉक, तीव्र मूत्रपिंड निकामी होणे आणि डायबेटिक किटोॲसिडोसिस असा अत्यंत धोकादायक निदान केले. रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्याने लगेचच खडण मध्ये इनोट्रोप सपोर्ट देण्यात आले. चार दिवस सतत देखरेख व योग्य उपचारांमुळे रुग्णाची प्रकृती स्थिर झाली आणि अखेर ते पूर्णपणे बरे होऊन आज डिस्चार्ज करण्यात आले. डॉ. निलेश मिसाळ यांनी सांगितले की, अत्यंत धोकादायक स्थितीत असलेला रुग्ण वेळेवर उपचारामुळे पूर्णपणे बरा झाला. विशेष आभार या यशस्वी उपचार प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावलेल्या डॉ. सनप सर, डॉ. संघर्ष पवार, डॉ. प्रदीप तसेच संपूर्ण खडण टीम यांचे मन:पूर्वक आभार!



## सुरताल संगीत विद्यालयातर्फे अभय जोशी यांचा गौरव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील सुरताल संगीत विद्यालयाचे अध्यक्ष सत्यवान शिंदे व उपाध्यक्ष, पत्रकार संघांचे सचिव राहूल देशपांडे यांनी अभय जोशी यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

नाशिक येथे झालेल्या सूर महाराष्ट्र पर्व-६ या मराठी गाण्यांच्या स्पर्धेत अभय जोशी यांना विशेष सन्मानपत्र प्राप्त झाले आहे. त्याबद्दल त्यांचा सुरताल संगीत विद्यालयातर्फे गौरव करण्यात आला. यावेळी भागवत आचार्य उपस्थित होते. त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



फोकस हाय हॉस्पिटल अँड ऑप्टिकल्स च्या उद्घाटन प्रसंगी खालेद चाऊस आणि रेहान खान यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना समाजसेवक पठाण मुसा खान,पठाण अमर जान आणि आमेर इनामदार सह आदी छायाचित्र दिसत आहे.

## शालिनी सुलाखे यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी

चकलंबा येथील स्व धर्मराज सुलाखे यांच्या पत्नी श्रीमती शालिनी सुलाखे



वय ७८ वर्ष यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. चकलांबा तालुका गेवराई येथील श्रीमती शालिनी धर्मराज सुलाखे (वय ७८) यांचे वृद्धापकाळमुळे २० जुलै रविवार रोजी दु:खद निधन झाले आहे. त्या अत्यंत मनमिळाऊ आणि धार्मिक स्वभावाच्या होत्या. रविवारी सायंकाळी चकलांबा येथे ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. विस्तार अधिकारी अरविंद, शिक्षक धनंजय, शिक्षक उदय, आणि चकलंबा येथील डॉ.विजय सुलाखे यांच्या त्या मातोश्री होत. अंत्यविधीसाठी गावातील ग्रामस्थासह छत्रपती संभाजीनगर, पैठण, गेवराई, बीड येथील नागरिक उपस्थित होते.

## भाजपाची माजलगाव तालुक्यातील पात्रुड मंडळ कार्यकारिणी जाहीर

### पात्रुड मंडळ कार्यकारिणीच्या सदस्यपदी जाधव व चव्हाण यांची निवड

पात्रूड । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाची माजलगाव तालुक्यातील पात्रुड मंडळ कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ओबीसी समाजातील धाडसी नेते म्हणून ओळख असणारे वैजिनाथरावजी जाधव व गोरख चव्हाण यांची भारतीय जनता पक्षाच्या पात्रुड मंडळ कार्यकारिणीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. तसेच शरदराव पवार यांची भाजपा पात्रुड मंडळ उपाध्यक्ष पदी व सिध्देश्वराव राठोड यांची भाजपा पात्रुड मंडळ सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे.



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशच्या मान्यतेनुसार लोकनेत्या पंकजा मुंडे, माजी खासदार प्रितम मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण आबा राऊत, माजी नगराध्यक्ष अशोकराव तिकडे, मंडळ अध्यक्ष पात्रुड अभिजितराव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली निवडी करण्यात आल्या असून सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी भाजपचे विचार तळागाळात पोहचवत लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करावेत तसेच शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळावा याकरिता प्रयत्न करावेत, असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'फार्मसी क्षेत्रात नवा मैलाचा दगड' : प्रा.डॉ. निखिल जाधव यांचे पुस्तक एम. फार्म विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध

दिंद्रुड । प्रतिनिधी

फार्मसी क्षेत्रात नवनवीन शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना दिशा देणारे गुरुकृपा इन्स्टिटच्युट ऑफ फार्मसीचे, विभाग प्रमुख प्रा.डॉ. निखिल जाधव यांनी एम. फार्मसी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मॉडर्न ॲनालॅटिकल टेक्निक्स असे नवीन पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे प्रथमदर्शी लोकार्पण गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष व प्रख्यात हृदयविकार तज्ञ डॉ.यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.

औषध निर्माण शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) विषयांमधील फार्मास्युटिकल नालिसिस हा विषय सर्व डिपार्टमेंटसाठी कॉमन आहे त्याच बरोबर यात सिलॅबसवर आधारित भारतीय लेखकांचे फारच तुरळक व समजण्यास कठीण पुस्तके आहेत त्याचबरोबर यांतील संकल्पना गुंतागुंतीची आणि भाषा अवघड असल्यामुळे विद्यार्थी या विषयाकडे दुर्लक्ष करतात असे जाधव यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी हे पुस्तक 'फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाने' निर्देशित केलेल्या बी. फार्मसी अंतिम आणि एम. फार्मसी प्रथमवर्ष अभ्यासक्रमातील फार्मास्युटिकल नालिसिस विषयाशी निगडीत बनवले आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी सुलभ भाषेत आणि अभ्यासक्रमावर आधारित मार्गदर्शन करणारे असून त्यात सविस्तर आकृत्या व माहितीपूर्ण तक्ते दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील नालिसिस विषयाची भीती निघून जावी तसेच विद्यार्थी परीक्षेसह संशोधन आणि औद्योगिक क्षेत्रातही आत्मविश्वासाने पुढे जावेत, हा या पुस्तकामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. निखिल जाधव यांनी सांगितले.



## अनिल कटक यांची महाराष्ट्र जन आरोग्य राज्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र जनआरोग्य राज्य कर्मचारी महासंघा च्या वतीने चतुर्थ श्रेणी कर्मचारी अनिल कटक यांची बीड जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी उपस्थित राज्य संघटक अमोल सुसे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष भोटकर तसेच कैलास ढाकणे, प्रशांत साळवे, गणेश नाईकनवरे, भारत गाजरे, थोरात,कमलाकर वखरे, विलास पवार आदी उपस्थित चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच डॉक्टर धूत डॉक्टर शिंदे इन्चार्ज धुरंधरे, इनचार्ज परिचारिका यांच्यावतीने नूतन बीड जिल्हाध्यक्ष अनिल कटक यांचा सत्कार करण्यात आला.



# अनिलदादांनी रणशिंग फुंकले

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवणार : अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कार आशीर्वादांचे तेज, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे सहकार्य ताकद व तमाम शिवसैनिकांच्या साथीने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवणार असून संपूर्ण बीड जिल्हा भगवामय करणार असल्याचे सांगत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले आहे.



शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि उपनेते अर्जुन खोतकर आणि सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारपासून सलग तीन दिवस बीड जिल्ह्यात विधानसभा निहाय बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. परळी, गेवराई, केज, माजलगाव विधानसभा मतदार संघ तसेच वडवणी येथे आढावा बैठक पार पडल्यानंतर काल दि.२१ जुलै रोजी दु.१.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यलय येथे अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेनेची रणनीती, ताकद आणि संघटना या तिन्ही घटकांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकीत यश मिळवण्यासाठी नियोजन करण्यात आले. पक्ष व संघटना आणखी बळकट करण्याच्या दृष्टीने अचूक नियोजन व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी यंदा शिवसेनेचा भगवा स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि शिवसेना महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी व्हिजेएन्टीसेना, एसटी कामगार सेनेचे आजी–माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी, सरपंच तथा शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेच्या यशस्वीरित्या पार पडलेल्या आढावा बैठकीचे सूत्रसंचलन प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

### शिवसैनिकांनो, पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम करून सिद्ध व्हा : बाप्पुसाहेब मोरे

तळागाळातील माणसांची जाणीव असणारे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वकर्तृतवाने घरघरात पोहचले. शिंदे साहेब सहकार्यासाठी पूर्ण ताकदीने आपल्या सोबत आहेत. यामुळे आता थांबायचे नाही तर पूर्ण नियोजन आणि परफेक्ट कार्यक्रम या सूत्रानुसार आपल्याला शहर–ग्रामीण भागात शिवसेनेचे संघटन मजबूत मजबूत करायचे आहे आणि शिवसेनेचा बालेकिल्ला हा बीड जिल्हाच आहे, हे दाखवून द्यायचं आहे. यामुळे पूर्ण ताकदीने कामाला लागा, स्वत:ला सिद्ध करा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात भगवा फडकवा असे आवाहन शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी शिवसैनिकांना केले.



## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना बाजार कोतवाली वेस पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करा

# अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन : पठाण

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा अन्यथा येत्या १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता बीड नगरपरिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी आज दिला.

पठाण यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतचा हा रस्ता नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून सध्या याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, पावसामुळे ते जलमय झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा तर निर्माण झालाच आहे, शिवाय कोणताही जीवघेणा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. हा रस्ता शहरातील प्रमुख व्यापारी मार्ग असून, दररोज जिल्हाभरातून व्यापारी व नागरिक या भागात ये – जा करतात. रस्त्याची ही अवस्था नागरिकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीर गंज चौक यादरम्यान रस्ता हा बीड नगरपरिषदेच्या अधिकाराखाली येत नसल्याची माहिती उप मुख्यअधिकारी सम्राट कदम यांनी दिली यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीर गंज चौक दरम्यान रस्त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय ते मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम यांनाही मागणीचे निवेदन देण्यात आले.

मनसेने प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तात्काळ रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नाही,तर १४ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजल्या पासून बीड नगर परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असे बीड नगरपरिषद कार्यालय, कार्यकारी अभियंता बीड व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# धारूर घाटात सिमेंट मिक्सर गाडी झाली पलटी

## चालक गंभीर जखमी, अरुंद रस्त्यामुळे अपघातांची मालिका सुरूच

धारूर । प्रतिनिधी

खामगाव–पंढरपूर मुख्य मार्गावरील धारूर घाटात आज पुन्हा एकदा भीषण अपघात घडला. एमएच ४४ यु ५४४५ या क्रमांकाची सिमेंट कॉंक्रीट मिक्सर गाडी घाटात उतरत असताना ब्रेक निकामी झाल्याने ती रस्त्यावरून खाली घसरली. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सदर गाडी घाट उतरत असताना अचानक ब्रेक फेल झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मोठा अनर्थ टळला असला तरी चालकाला गंभीर दुखापत झाली आहे.



धारूर घाट हा अत्यंत अरुंद आणि वळणावळणाचा असून, या ठिकाणी यापूर्वीही अनेक वेळा अपघात झाले आहेत. विशेषत: अवजड वाहनांची वाहतूक होत असलेल्या या मार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. धारूर घाटात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. आज घडलेला अपघात हे त्याचे ताजे उदाहरण ठरले आहे. घाटाचा रस्ता अत्यंत अरुंद आहे, अवजड वाहने ये–जा करतात, आणि कोणतेही सुरक्षा उपाय नाहीत, मग यावर प्रशासन गप्प का आहे? असा थेट सवाल आता गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# आईस्क्रीम खाणे पडले महागात

## गाडीचे डिक्कीतून ५० हजार रुपये चोरट्याने केले लंपास

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जहागीर मोहा येथील एका व्यक्तीला आईस्क्रीम खाणे चांगलेच महागात पडले असून गाडीच्या ठेवलेले डीकीतील पन्नास हजार रुपये चोरट्यांनी एका क्षणात लंपास केले आहेत.



धारूर तालुक्यातील जहागीरमोहा येथील रहिवासी महादेव मंदे यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेतून एक लाख रुपये काढले होते. बाकीचे ५० हजार रुपये आपली मोटरसायकलच्या डिक्की मध्ये ठेवले गावाकडे जात असताना एसबीआय बँकेसमोरील आईस्क्रीमच्या गाड्यावर त्या ठिकाणी आईस्क्रीम घेत असताना तेवढ्यात चोरट्यांनी याच संधीचा फायदा घेत त्यांचे दुर्लक्ष गाडीकडे असल्याचे पाहून डिकीचे लॉक तोडून त्यातील पन्नास हजार रुपये लंपास केले आहेत. आईस्क्रीम खाल्ल्यानंतर महादेव मंदे आपल्या मोटरसायकलकडे आले असता त्यांना डिक्कीचे लॉक उघडे दिसले व त्यातील ५०००० रुपये लंपास केल्याचे आढळून आले. त्यांनी इतरत्र शोध घेतला परंतु पैसे मिळाले नाहीत याबाबत धारूर पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास धारूर पोलीस करत आहे परंतु या घटनेवरून आईस्क्रीम खाणे महादेव मंदे यांना चांगलेच महागात पडले आहे.

# 'पांदण'ची विकासकामे केव्हा होणार?

## रस्त्याअभावी शेतकऱ्यांना चिखल तुडवत जावे लागते शेतात

पात्रुड । प्रतिनिधी

शासनाने पावसाळी अधिवेशनादरम्यान शेतकऱ्यांना शेतशिवारात जाण्यासाठी सुविधा व्हावी, याकरिता पांदण रस्त्यांची रूंदी वाढविण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेतशिवारात आधुनिक काळानुसार यंत्रसामुग्री घेऊन जाणे सोयीचे होणार आहे. मात्र, या रस्त्यांच्या मजबुतीसाठी महायुती शासनाने सुरू केलेल्या पालकमंत्री पांदण रस्ते योजनेतून विकासकामे होणार काय? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

राज्यातील सर्वच जिल्ह्यात शेतशिवारात जाण्यासाठी पूर्वीपासून पांदण रस्ते आहेत. पूर्वी बैलबंडीने पावसाळ्याच्या दिवसात साहित्य घेऊन जात शेतीची कामे केली जात होती. मात्र, आधुनिक काळात बैलबंडीऐवजी कृषी तंत्रज्ञान आले. यामुळे पांदण रस्त्यांनी आता ट्रॅक्टरसारखे वाहन जाऊ लागले आहेत. पावसाळ्याच्या दिवसात पांदण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य राहत असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात वाहन घेऊन जाणे कठीण जाते. त्यामुळे पांदण रस्त्यांचे खडीकरण करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. मात्र, दरम्यानच्या काळात पांदण रस्ता योजनेतून एकाही रस्त्याचे खडीकरण करण्यात आले नव्हते. आता शासनाने पांदण रस्त्यांचे रूंदीकरण करण्याचा निर्णय घेतल्याने आतातरी या रस्त्यांचे खडीकरण होणार काय? हा प्रश्न कायम आहे.



**मागील अनेक वर्षापासून पांदण रस्ता दुर्लक्ष**

शेतापर्यंत जाण्यासाठी सुरळीत मार्ग नसल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाने शेतीच्या विकासासाठी पालकमंत्री पांदण रस्ता, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून पांदण रस्त्यांचा विकास करण्याचे निश्चित केले होते. परंतु, मागील काही वर्षापासून पांदण रस्त्याच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जात आहे. असे असतानाच नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात शासनाने पांदण रस्त्यांची रूंदी वाढविण्यासंदर्भात सुतोवात केले. त्यामुळे पांदण रस्त्याचे उद्धार होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात अंबाजोगाई येथे निदर्शने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील सर्व विरोधी पक्षाच्या वतीने आज जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली.

आज सकाळी शहरातील शिवाजी महाराज चौक येथे सर्व विरोधी पक्षीय नेते माजी आमदार पुर्थ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, डॉ. नरेंद्र काळे, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष असेफोदिन खतीब, ॲड. इस्माईल गवळी, अभिजित लोमटे, संजीवनी देशमुख, ॲड. माधव जाधव, ॲड. प्रशांत शिंदे, मदन परदेशी, बन्सी अण्णा जोगदंड, सोमनाथ धोत्रे आदी उपस्थित होते.




# धोंडराई येथे रवींद्र हातागळे यांच्यावर जीवघेणा हल्ला

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे काल दि.२१/०७/२०२५ रोजी रवींद्र सखाराम हातागळे यांचा मुलगा रोहित हातागळे हा तानाजी सुतार रा.धोंडराई यांच्याकडे मागच्या वर्षी दिलेली उचलची बाकी मागण्यासाठी गेला होता. तानाजी सुतार यांना बाकी १ लाख १४ हजार मागितले म्हणून गावातीलच तानाजी सुतार, गजानन सुतार, दादाराव बबन सुतार आणि रामचंद्र सुतार यांनी रवींद्र हातागळे यांच्या घरात घुसून मारहान करून जीवघेणा हल्ला केला आहे.

या हल्ल्यात रवींद्र हातागळे यांच्या डोक्याला गंभीर मार लागला असल्यामुळे त्यांना तात्काळ गेवराई सरकारी दवाखान्यात दाखल केले परंतु गंभीर मार लागल्या मुळे त्यांना बीड येते रेफर करण्यात आले असून त्यांना १० ते १२ टाके डोक्याला पडले आहेत.

रवींद्र हातागळे हे बीड येथील सरकारी दवाखान्यात ऍडमिट असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत ही घटना काल दि.२१/०७/२०२५ रोजी ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान घडली असून अद्याप गेवराई पोलीसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला नसल्याची माहिती हातगाळे यांच्या पत्नी यांनी दिली आहे.



# मागेल त्याला सोलार योजनेमधुन शासनाकडून शेतकऱ्याची लूट

टाकरवण । प्रतिनिधी

मागेल त्याला सोलार या योजने अंतर्गत शासनाकडून प्रचंड शेतकऱ्यांची लूट करण्यात आली आहे. पैसे भरून सात आठ महिने झाले आहेत तरी अजून अप्रोल मिळाले नाहीत आणि ज्याला अप्रोल मिळाले त्याला पंप पुरवठा उपलब्ध नाही असे सांगण्यात येत आहे. या योजनेत चडउड़ चा सुद्धा गलथान कारभार पाहण्यास मिळत आहे.



ढालेगाव ग्रामपंचायत मधील ढालेगाव तपेनिमगाव येथील शेतकरी ज्योती विजय तौर, अनिल शेषराव मोरे, किरण बळीराम शिंदे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी अनेक महिन्यापासून पेमेंट केलेले आहेत. अद्याप ही त्यांना कंपनी निवडीचे ऑप्शन आलेले नाहीत काही शेतकऱ्यांना सोलार कंपनी निवडीचे आले आहेत. स्टॉक उपलब्ध नाही असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मागेल त्याला सोलार पंप या योजने अंतर्गत शासनाकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे.

# पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री क्षेत्र नारायणगड येथे वृक्षारोपण व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या धाकट्या पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायणगड येथे ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबिर व वृक्षारोपण यांचा समावेश होता. परिसरातील नागरिकांचा या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे आयोजन गणेश लांडे यांच्या पुढाकाराने व प्रयत्नातून करण्यात आले.



या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांची उपस्थिती. त्यांनी पवित्र गडभूमीतून ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा व आशीर्वाद दिले. यानंतर त्यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महाराजांनी कार्यक्रमातील सामाजिक उपक्रमांचे कौतुकही केले. या वेळी भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, भटक्या विमुक्त प्रदेश उपाध्यक्ष भाग्यश्रीताई ढाकणे, बीड ग्रामीण मंडळ अध्यक्ष मनोज काका पाटील, बीड ग्रामीण मंडळ उपाध्यक्ष विठ्ठल शिंदे, भागवत दुबाले, सरचिटणीस नरेश पवार, प्रिताताई कुकडेजा, राजू शहाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरात तरुणांपासून महिलांपर्यंत अनेकांनी सहभाग घेतला. वृक्षारोपण उपक्रमात गड परिसरात विविध प्रकारची केसरी आंबा, नारळ व अन्य उपयुक्त झाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टिकोनातून राबवलेल्या या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून शिक्षणाची गोडी वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्लास्टिकमुक्तीसाठी कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजक गणेश लांडे यांनी राबविलेल्या या सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. श्री क्षेत्र नारायणगड परिसर आज समाजसेवेच्या विविध उपक्रमांमुळे प्रेरणास्थान ठरत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT